डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मौजे कळवा जि. ठाणे येथील सामाजिक न्याय भवन (टप्पा-२) च्या कामाकरीता निधी उपलब्ध करून देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: सान्याभ-२०१७/प्र.क्र.४२४/ बांधकामे
मंत्रालय, विस्तार इमारत
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०५ मार्च, २०१९.

वाचा :-

१) सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. विघयो-२००६/ प्र.क्र.२३८/विघयो-१, दि. १/६/२००६
२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. बीसीएच-२००७/प्र.क्र. ३०/ मावक-४,दि.१७/२/२००७.
३) शासन ज्ञापन क्र.बीसीएच-२००८/प्र.क्र.३३/मावक-७, दि.६/११/२००९.
४) आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचे पत्र क्र. सकआ/शिक्षण/सान्याभ /ठाणे/१४५१/बांधकाम/सुधा प्रस्ताव/ का-५ अ, दि. १०/५/२०१३ चे पत्र.
५) शासन ज्ञापन क्र.सान्याभ-२०१३/प्र.क्र.९०/बांधकामे, दि.५/१२/२०१३.
६) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे यांचे पत्र जा.क्र. ठामं/प्रश/५९३० /दि.५/१०/२०१७ चे पत्र.
७) शासन परिपत्रक, नियोजन विभाग, क्र.ससमा २०१०/प्र.क्र.४८ (भाग-१)/ का-१४६१, दि. ११/६/२०१८.

प्रस्तावना :-

सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भीय क्र. १, दि. १/६/२००६ अन्वये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक न्याय भवन उभारण्या बाबत मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने संदर्भ क्र.५, दि. ५/१२/२०१३ च्या शासन ज्ञापनान्वये रू.८,००,३६,६६७/- (अक्षरी रूपये आठ कोटी छत्तीस हजार सहाशे सदुसष्ट्र फक्त) इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे असून सार्वजनिक बांधकाम विभागाने सूचविल्यानुसार अंदाजपत्रकातील फर्निचर, संगणकीय चार्जेस, सोलर पासिव्ह आर्किटेक्चर, एनर्जी सेव्हींग ईक्विमेंट यांची तरतूद वगळण्यात आली आहे. आता, संदर्भ क्र. ६ येथील पत्रान्वये अधीक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम) मंडळ, ठाणे यांच्या दि. ५/१०/२०१७ च्या पत्रान्वये मौजे, कळवा, जि.ठाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाचे बांधकाम करणे (टप्पा-२) चे रू.१४,६३,७५,०००/- (अक्षरी रूपये चौदा कोटी त्रेसष्ट लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले आहे. सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले असता सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणीत केल्यानुसार रू.११,८६,६३,२६७/-(अक्षरी रूपये अकरा कोटी शहाऐंशी लक्ष त्रेसष्ट हजार दोनशे सदुसष्ट फक्त) इतक्या रकमेस मान्यता देण्यास सहमती दर्शविली आहे. त्यानुषंगाने

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मौजे कळवा जि. ठाणे येथील सामाजिक न्याय भवन (टप्पा-२) च्या कामाकरीता प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

अधीक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम) मंडळ, ठाणे यांच्या संदर्भ क्र.६ येथील दि. ५/१०/२०१७ च्या पत्रान्वये मौजे, कळवा, जि.ठाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवनाचे बांधकाम करणे (टप्पा-२) चे रू.१४,६३,७५,०००/- (अक्षरी रूपये चौदा कोटी त्रेसष्ट लक्ष पंच्याहत्तर हजार फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले होते. सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केले असता सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणीत केल्यानुसार रू.११,८६,६३,२६८/-(अक्षरी रूपये एकरा कोटी शहाऐंशी लक्ष त्रेसष्ट हजार दोनशे सदुसष्ट फक्त) इतक्या रकमेस खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) काम सुरू करण्यापूर्वी मांडणी नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.

२) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करूनच काम हाती घ्यावे.

३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१, दि.१० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

४) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र. बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

५) प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रकास विभागाच्या वतीने सक्षम प्राधिकारी यांचे साक्षांकन करणे आवश्यक आहे.

२. सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती Recapitulation Sheet प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या रू.११,८६,६३,२६८/- (अक्षरी रूपये एकरा कोटी शहाऐंशी लक्ष त्रेसष्ट हजार दोनशे अडुसष्ट फक्त) इतकी रक्कम परिगणत करण्यात आली असून Recapitulation Sheet पुढीलप्रमाणे आहे.

Name of the Department : SOCIAL JUSTICE DEPTT.			
Name of Work : Construction of Dr. Babasaheb Ambedkar Social Welfare office Building at Kalwa, Dist- Thane (Phase-II- Furniture, Internal Roads, Compound wall, Retaining Wall, STP Plant, Underground Water tank etc.)			
RECAPITULATION SHEET			
Sr. No.	**Particulars of Items**	**Norms (Unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum)**	**Cost Rs.**
(A)	ESSENTIAL ITEMS		
1	**Building Proper (Scope)** a) Area (Sqmt.) b) Number of Floors c) Foundation in B.C./weak Soil d) Cost of Contruction		

2	**Electrification** Internal External	5% of 1 (d) 6% of 1 (d)	**Total**	0 0 **0**
3	**Water Supply and Sanitation**	5% - of 1 (d)		0
4	**Miscellaneous Items**			
	Internal Roads 2000	5000	per Sqmt	1,00,00,000
	compound wall 352	12000	per Rmt	42,24,000
	Furniture 2503.60	3000	per Sqmt	75,10,800
	Retaining Wall 128	30000	per Rmt	38,40,000
	Covering of existing Nalla 20	165000	per Rmt	33,00,000
	Road side Closed Gutter 432	10000	per Sqmt	43,20,000
	Landscaping & Gardening		Lump sum	20,00,000
	Falg Post		Lump sum	3,00,000
	LAN/WAN, fire fighting, Lightening conductor, street lights, solar passive, telephone wiring etc. as estimate of electrical division		Lump sum	3,76,36,197
	Interior Designing 2503.60	3000	per sqmt	75,10,800
	paver blocks 1710.00	2200	per sqmt	37,62,000
	Transformen Substation 55.00	25000	per sqmt	13,75,000
	security Cabin 8.76	15000	per sqmt	1,31,400
	ST plant &septic Tank as per Estimate			52,67,000
	Parking Arrangement			10,00,000
	Underground Water Tank			20,00,000
			Total	**9,41,77,197**
	Sub Total (A) = (1)+ (2)+ (3)+ (4)			**9,41,77,197**
(B)	OPTIONAL ITEMS			
Sr.	Items			
	subtotal (B)			**0**
	PROJECT (A) + (B) (T)			**9,41,77,197**
	Add 4% for Contingencies on (d)			**37,67,088**
	Add 12% for GST on (T)			**1,13,01,264**
	Add 12% for price Escalation on (T)			**94,17,720**
	TOTAL COST OF PROJECT			**11,86,63,268**
	Say Rs. Lakhs			**1186.63**

३. प्रस्तूत सामाजिक न्याय भवनाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करून, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करून ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांनी तात्काळ करावी. ई-निविदा

प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ई-निविदा प्रक्रियेची सर्व कागदपत्रे सामाजिक न्याय विभागाकडे (उपभोक्ता विभाग) दायित्व मंजूरीसाठी पाठविण्यात यावीत. सामाजिक न्याय विभागाची अंतिम मान्यता झाल्यानंतर बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

४. यावर होणारा खर्च मागणी क्र.एन-४, मुख्य लेखाशिर्ष ४२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, ८००- इतर खर्च, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०१)(०१), प्रत्येक जिल्हयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बांधणे (अ.जा.उ.यो.) ४२२५ ०४९९ (५३ मोठी बांधकामे) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. सदर प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच अटींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची जबाबदारी आयुक्त, समजाकल्याण, पुणे यांची राहील.

६. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तीकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकार तसेच संदर्भ क्र.७, नियोजन विभाग दि.११/६/२०१८ च्या परिपत्रकान्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०३०५१३१५१४४२२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.03.05 13:18:56 +05'30'

(अनिल कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, ठाणे.
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, मुंबई.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, ठाणे.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पुणे.
१०) निवडनस्ती (बांधकामे)